स्थायी समितीच्या **मंगळवार** दिनांक 09–08–2011 रोजी दुपारी 12–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## <u>उपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | अध्यक्ष |
| 2. | श्री. विकास उर्फ बाबा माधवराव मैंद | सदस्य |
| 3. | श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |
| 4. | सौ. उषा गोपाल बोहरे | सदस्या |
| 5. | श्री. भारतभूषण ऋषीपंत गायधणे | सदस्य |
| 6. | श्री. बंडू उर्फ सुधिर हरिदास राऊत | सदस्य |
| 7. | श्री. प्रविण आत्माराम सांदेकर | सदस्य |
| 8. | श्री. अरविंदरपाल सिंग उर्फ बब्बी बावा | सदस्य |
| 9. | श्री. अरुण वसंतराव डवरे | सदस्य |
| 10. | श्री. झुल्फेकार अहमद शेख अहमद भूट्टो | सदस्य |
| 11. | सौ. सिंधु रामाजी उईके | सदस्या |
| 12. | सौ. कल्पना सुरेश डवरे | सदस्या |
| 13. | श्री. मोहम्मद कामील अंसारी मो. हसन | सदस्य |
| 14. | डॉ. मिलींद माने | सदस्य |
| 15. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |

## <u>अनुपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. मंदाताई उर्फ आक्का गंगाधर लेंडे | सदस्या |

## <u>उपस्थित अधिकारी</u>

1) श्री. विष्णुपद बुटे, अपर आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

<u>ठराव क्रमांक 58</u> :— धंतोली झोन क्र. 4 झोनल अर्थसंकल्पाला स्थायी समितीचे ठराव क्र. 34 दिनांक 21.06.2011 अन्वये मंजुरी प्राप्त असुन जुणे देणे साठी रु. 168.56 लक्ष व सन 2011—12 साठी 583.66 असे एकूण 752. 22 लक्ष चे प्रावधान उपलब्ध आहे. मार्च अखेरीस पाठविलेली काही देयके परत असल्यामुळे "जुने देणे" चे राशी मध्ये रु. 9.30 लक्षचे अधिकचे प्रावधान आवश्यक असल्यामुळे या मंजुर पुनःर्विनियोजन प्रस्तावात "जुने देणे" च्या राशीमध्ये समायोजन करुन "जुने देणे" साठी रु. 177.86 लक्ष सन 2011—12 साठी 574.36 लक्ष अशी दुरुस्ती करण्यात आली असुन एकूण रु. 752.22 लक्ष च्या रक्कमेत कोणताच बदल करण्यात आलेला नाही. करीता उपरोक्त प्रमाणे दुरुस्ती पुनःर्विनियोजन प्रभाग समिती ठराव क्र. 92 दि. 25.07.2011 नुसार मंजुरी प्रदान केली असुन मा. स्थायी समितींचे मंजुरी व नोंद घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 59</u> :— नागपूर शहरातील विविध चौकात Temperature, Humidity व Carban Monitaring display लावण्याबाबत नविन प्रकारच्या जाहिरात प्रस्तावास (New innovative Media) रु. १७,४६,०६४/— ग्राउंड रेंट व जाहिरात शुल्क आकारुन खालील नमुद केलेल्या अटी व शर्तीवर सार्वजनिक उपयोगाच्या दृष्टीने B.O.T. तत्वावर ३ वर्षाकरीता एकुण ५० चौकातील प्रत्येकी २ डिस्प्ले बोर्ड करीता मंजुरी देऊन रितसर निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन खालील अटी व शर्तीचा समावेश करुन विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

- निविदाकार/कंत्राटदार/संयुक्त उपक्रम कंपनी यांचे कडे किमान १० वर्षाचा "Instrumentation" च्या कामाचा अनुभव असावा व सदर "Instrumentation" कुठल्याही शासकीय यंत्रणेस पुरविल्याचा आवश्यक पुरावा निविदाकाराजवळ असावा.

- Temperature, Humidity व Carban Monitaring display या लावण्यात येणाऱ्या संयत्रणात कंत्राटाच्या मुदतीत कुठलाही बिघाड झाल्यास अथवा ही सयंत्राची सुस्थीतीत ठेवण्यास निविदाकार असमर्थ ठरल्यास दंडात्मक कारवाई चे प्रावधान निविदा अटी मध्ये ठेवण्यांत यावे.

<u>अटी व शर्ती</u>

१. म.न.पा. जाहिरात पॉलीसी २००१ मधील सर्व अटी व शर्ती जाहिरात दारास बंधनकारक राहतील.

२. B.O.T. तत्वानुसार जाहिरात व डीस्प्लेकरीता परवानगी ३ वर्षाकरीता देण्यात येईल. ३ वर्षानंतर जाहिरात फलक व डीस्प्ले चालु स्थितीत म.न.पा. ला हस्तांतरीत करावे लागतील.

३. जाहिरात बोर्ड उभारण्याकरीता वाहतुक विभाग, म.न.पा. व वाहतुक विभाग, पोलीस यांचे नाहरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल. व त्यानंतर जाहिरात फलकाची व डिस्प्ले बोर्डची जागा निश्चित करण्यात येईल.

४. जाहिरातदारास जाहिरात लायसन्स फी व्यतीरिक्त जाहिराती करीता प्राप्त होणाऱ्या ग्राउंड रेंट मधे दरवर्षी १० % वाढ करण्यात येईल.

५. जाहिरात फलकाची उंची, मोजमाप, ग्राउंड क्लिअरंस व जागा म.न.पा. तर्फे निश्चित करण्यात येईल.

६. Temprature, Humidity व Carban Monitaring display unit या उपकरणंची देखभाल, दुरुस्ती व अचुकता (Accuracy) याकरीता जाहिरातदार स्वत: जवाबदार राहतील.

७. जाहिरातदारास विद्युत व्यवस्था स्वखर्चाने करावी लागेल.

<u>ठराव क्रमांक 60</u> :— नागपूर शहरातील विविध चौकातील ट्रॅफीक रोटरी व ट्रॅफीक आयलॅन्ड (Traffic rotaries & Traffic island) चे विकास/सौदर्यीकरण व रखरखाव करण्याचे अटीवर जाहिराती करण्याकरीता रु. ११,८२,०००/— ग्राउंड रेंट व जाहिरात शुल्क आकारुन खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीवर ३ वर्षाकरीता एकुण ५० चौकातील ट्रॅफीक रोटरी व ट्रॅफीक आयलॅन्डवर B.O.T. तत्वावर करण्याचे प्रस्तावास मंजुरी देऊन रितसर निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन खालील अटी व शर्तीचा समावेश करुन विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

- सौदर्यीकरणाची योग्य निगा/सुस्थीती व दुरुस्ती करणे निविदाकार/संयुक्त उपक्रम कंपनी यांचे मार्फत होणे आवश्यक राहील. निगा योग्य न राखल्यास निविदाकारांकडुन दंड वसुल करण्याचे प्रावधान निविदा अटी व शर्ती मध्ये असावे.

**अटी व शर्ती**

१. म.न.पा. आउटडोअर ॲडव्हरटायजिंग पॉलीसी २००१ मधील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहील.

२. जाहिरात फलक लावण्याकरीता वाहतुक विभाग, म.न.पा. व वाहतुक विभाग, पोलीस यांचे नाहरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल. व त्यानंतर जाहिरात फलकाची व डिस्प्ले बोर्डची जागा निश्चित करण्यात येईल.

३. संबंधीत प्रस्तावाचा ३ वर्षाचा कालावधी संपल्यानंतर संबंधीत जाहीराती त्वरीत बंद करुन स्ट्रक्चर सहित जाहिरात फलक म.न.पा.स सुस्थीतीमधे हस्तातरीत करावे लागेल.

४. जाहिरातदारास जाहिरात लायसन्स फी व्यतीरिक्त जाहिराती करीता प्राप्त होणाऱ्या ग्राउंड रेंट ग्राउंड रेंट मधे दरवर्षी १० % वाढ करण्यात येईल.

५. संबंधीत जाहीरातदारास म.न.पा. तर्फे विविध सामाजीक योजनांबाबत जाहीराती करावयाचा असल्यास त्या विनामुल्य प्रदर्शित कराव्या लागतील.

६. जाहिरात फलकाची उंची, मोजमाप, ग्राउंड क्लिअरंस व जागा म.न.पा. तर्फे निश्चित करण्यात येईल.

७. संबंधीत ट्रॅफीक आयलॅन्डचे सौदर्यीकरण, देखभाल व दुरुस्ती जाहिरातदारास स्वखर्चाने म.न.पा. चे निर्देशानुसार करावी लागेल.

<u>ठराव क्रमांक 61</u> :– नागपूर शहरातील विविध सार्वजनिक ठीकाणी B.O.T. तत्वावर जाहिरात फलक लावण्याचे अधिकारासह नागरिकांच्या सोयीकरीता सार्वजनिक संडास व मुत्रीघर बाधण्याबाबत जाहिरातदारास रु. १५५/– प्रति चौ. मीटर ग्राउंड रेंट व जाहिरात शुल्क आकारुन खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीवर १० वर्षाकरीता एकुण १४० जागेवरील प्रस्तावास मंजुरी देऊन रितसर निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन खालील अटी व शर्तीचा समावेश करुन विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

- निविदाकार/संयुक्त उपक्रम कंपनीला संडास/मुत्रीघर बांधण्याचा व चालविण्याचा राज्यस्तरावर/राष्ट्रीयस्तरावर/आंतरराष्ट्रीय स्तरावर अनुभव असावा.
- निविदाकार संयुक्त उपक्रम कंपनी मार्फत जास्तीत जास्त संडास/मुत्रीघर बांधण्याचे/चालविण्याचे महानगरपालिकेच्या स्तरावर कामाचा अनुभव असल्याचे पुरावे आवश्यक असावे.
- निविदाकार जाहिरात करुन हा प्रकल्प चालविणार असल्यामुळे या प्रकल्पाचा मुळ हेतु संडास व मुत्रीघर यांची सुस्थीती व दुरुस्ती योग्य प्रकारे राखुन तो चालविणे आवश्यक राहील. जर संडास व मुत्रीघराची योग्य निगा/सुस्थीती/दुरुस्ती न राखल्यास आवश्यक दंडनिय प्रावधान निविदेमध्ये असावे याची काळजी निविदा काढतांना व अटी व शर्ती मध्ये प्रशासनाने टाकावे.

**अटी व शर्ती**

१. म.न.पा. आउटडोअर ॲडव्हरटायजिंग पॉलीसी २००१ मधील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहील.

२. B.O.T. तत्वावर सार्वजनिक संडास व मुत्रीघर बांधुन त्यावर जाहिरात करण्याकरीता परवानगी फक्त १० वर्षा करीता देण्यात येईल, त्यानंर सार्वजनिक मुत्रीघर व संडास जाहिरात फलकासह सुस्थीतीत म.न.पा. ला हस्तांतरीत करावे लागेल.

३. जागेच्या उपलब्धतेनुसार सार्वजनिक संडास व मुत्रीघर बांधकाम पुर्व परवानगी घेवुन करावे लागेल.

४. निविदाकारास प्रस्तावित मुत्रीघर व संडासचे बांधकाम स्वखर्चाने करावे लागेल, तसेच या करीता पाणी, सिवर लाईन, ईलेक्ट्रीसीटीची व्यवस्था स्वखर्चाने करावी लागेल.

५. निविदाकारास म.न.पा. जाहिरात पॉलीसीनुसार जाहिरातीचे आकारानुसार जाहिरात शुल्क/ लायसंस फी भरावी लागेल.

६. जाहिरात फलकाची उंची, मोजमाप, ग्राउंड क्लिअरंस व जागा म.न.पा. तर्फे निश्चित करण्यात येईल.

७. सदर्हु जाहिरातदारास/संस्थेस शौचालय व मुत्रीघरवर जाहिरात लावून व “पैसे द्या व वापरा” याव्दारे मिळणा–या पैशातुन शौचालय/मुत्रीघरचा देखभाल व दुरुस्ती खर्च करावा लागेल. प्रवेश शुल्काचे दर सुलभ शौचालयामध्ये आकारण्यात येणा–या दराप्रमाणेच आकारावे लागेल.

८. जाहिरात व बांधकामाकरीता जे जे नाहरकत पत्र आवश्यक असतील ते निविदाकारांस स्वत: प्राप्त करावे लागतील. म.न.पा. याकरीता आवश्यक मदत करेल.

९. निविदेमधे नमुद केलेल्या जागेव्यतीरिक्त ईतर ठीकाणी जागा उपलब्ध झाल्यास आवश्यकतेनुसार जागा उपलब्ध करुन देण्यात येतील.

१०. जाहिरातदारास जाहिरात लायसन्स फी व्यतीरिक्त जाहिराती करीता प्राप्त होणाऱ्या ग्राउंड रेंट मधे दरवर्षी १० % वाढ करण्यात येईल.

११. संबंधीत जाहीरातदारास म.न.पा. तर्फे विविध सामाजीक योजनांबाबत जाहीराती करावयाचा असल्यास त्या विनामुल्य प्रदर्शित कराव्या लागतील.

<u>ठराव क्रमांक 62</u> :– नागपूर शहरातील पथदिव्यांच्या दुरुस्तीकरीता मनुष्यबळ, शिडी–गाडी व किरकोळ साहित्य उपलब्ध करण्याकरीता ई–निविदा बोलाविल्या असता प्राप्त निविदांपैकी मे. साधना इलेक्ट्रिक वर्कस्, मे. बालाजी असोसीऐटस्, सोनू इलेक्ट्रकल्स, मे. अनिल इलेक्ट्रीकल्स ॲण्ड असोसीऐटस्, मे. लिंक इंटरप्राईजेस्, मे. राहूल कन्स्ट्रक्शनस्, मे. व्ही.एस. इंटरप्राईजेस व मे. दत्त इलेक्ट्रिकल्स यांचे प्राकलनीय दरांच्या तुलनेत 0.6 टक्के ते 16.66 टक्के ने कमी दर असलेले सुधारीत निविदा दर मंजूर करुन आवश्यकतेनुसार रु. 67,73,800/– पर्यंत खर्च सिमीत ठेऊन त्यांचेकडून झोन क्र. 1 ते 10 मधे पथदिप देखभाल दुरुस्तीचे काम करवून घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 63</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर